2021-22

LIJ

# Loknayak

## Interdisciplinary Peer Reviewed Journal For Innovative Research And Evaluation

ISSN (L) 2278 - 4284

Arts & Science College 160 KURHA

Issue :
January
2022
Vol. : IX

# - I N D E X -


| Sr. No. | Title / Name of the Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | इतिहास लेखनात हिंगोली जिल्ह्यातील नाणे संग्रहकांचे योगदान<br>डॉ. राजाराम रा. पिपळपल्ले | 1 |
| 2 | A Comparative Study on Food Intake Pattern of Home Science and Arts Faculty Girl Students<br>Dr. G. A. Bhalerao | 13 |
| 3 | Gender Differences in Mental Stress and Mental Health of Employees<br>Vidhya T. Ambhore | 17 |
| 4 | Human Relationships Present in Jaishree Misra's Novel 'Afterwards'<br>Ajay Madhukarrao Kalmegh | 21 |
| 5 | Hardy's 'Tess of the d'Urbervilles' as a Pessimistic Novel.<br>Dr. G.B.Mane | 26 |
| 6 | Stress And Women's Health<br>Dr Sarita Deshmukh | 28 |
| 7 | नवइतिहासवाद : संकल्पना, व्याप्ती व मर्यादा<br>डॉ. धनंजय देवळालकर | 33 |
| 8 | डॉ. जयंत नारळीकर : मराठी साहित्याला समृद्ध करणारा विज्ञान लेखक<br>डॉ.आबासाहेब उत्तम सरवदे | 36 |
| 9 | भारतीय शास्त्रीय संगीतात पूर्णवादाचे स्थान<br>प्रा .संगीता चाटी | 40 |
| 10 | सम्राट अशोकाच्या स्थापत्य कलेतून प्रतिबिंबित होणारे नैतिक विचार<br>प्रा. डॉ. विलास विठ्ठलराव गुजर | 44 |
| 11 | चित्रपट सृष्टीतील अलौकीक वाग्गेयकार पं. रवीन्द्र जैन<br>प्रा. डॉ. ज्वाला नागले | 48 |
| 12 | सतगमहाचे अभिनव तंत्र – वैक्तिक सतगमह<br>डॉ.स्मिता जाधव | 54 |
| 13 | नाथजोगी समाजाचे पारंपारिक लोकसंगीत – भारुड<br>चिराग रामभाऊ बोरवार | 59 |


Arts & Science College * KURHA * 160

विश्व स्वधर्म सूर्ये पाहो

Education Society Yavatmal's

# Loknayak Bapuji Aney Mahila Mahavidyalaya

# LOKNAYAK

(ISSN (L) 2278 - 4284)

INTERDISCIPLINARY PEER REVIEWED JOURNAL FOR INNOVATIVE RESEARCH AND EVALUATION

# CERTIFICATE

This is to certify that,

Dr./Mr./Mrs./Ms. डॉ.स्मिता जाधव

has published his / her Research paper / Article / Review / Research Work on

the topic : सतगमहाचे अभिनव तंत्र – वैक्तिक सतगमह

in the Double-blind peer reviewed journal ' Loknayak : Interdisciplinary Peer Reviewed Journal for Innovative Research and Evaluation' for the Issue : January 2022.

**Executive Editor**
Dnyaneshwar Gatkar
Dept. of English
LB Aney Mahila Mahavidyalaya,
Yavatmal

**Cheif Editor**
Dr. Durgesh Kunte
Principal
LB Aney Mahila Mahavidyalaya,
Yavatmal

Arts & Science College 160

Certificate No. : 2022/IX/JAN/012

# सतगमहाचे अभिनव तंत्र – वैक्तिक सतगमह

डॉ.स्मिता जाधव
सहाय्क प्राध्यापक
(इतिहास विभाग प्रमुख)
कला व विज्ञान महाविद्याल, कुऱ्हा
ता.तिवसा, जि. अमरावती. मो.७६४२९१०३८

सारांश :

विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतामध्ये ब्रिटीश सत्तेबद्दल कमालीचा असंतोष पसरला १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. त्यामूळे भारतामध्ये वंगभंग आंदोलन झाले. पहिल्या महायुध्दादरम्यान ब्रिटीश साम्राज्यांतर्गत असणाऱ्या भारताने इंग्लंडला मदत केली. परंतु सरकारने भारतीयांच्या कोणत्याही मागण्याची पूर्तता केली नाही. त्यापाठोपाठ रौलेट कायदा, जालीयनवाला बाग हत्याकांड,हंटर कमिशन अशा विविध प्रकरणातून इंग्रजांच्या शोषक नीतीची साक्ष पटली. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीनी असहकार चळवळ सुरु केली. त्यानंतर घडलेल्या अनेक राजकीय घडामोडी घडल्या आणि त्यानंतर महात्मा गांधीनी सविनय कायदेभंग आंदोलन सुरु केले.

१९३४ मध्ये सविनय कायदेभंग मागे घेण्यात आले. पूढील काळात महात्मा गांधीनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली या सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड करण्यात आली या सत्याग्रहात सामील झालेल्या जवळपास २५००० ते २६००० लोकांना सरकारने अटक केली या सत्याग्रहात स्त्रियाही मोठया प्रमाणावर सहभागी झाल्यात आणि ब्रिटीश सरकारसमोर आव्हान उभे केले.

महात्मा गांधीनी विहीत केलेल्या प्रणालीनुसार सरकार विरोधी आंदोलनाच्या लाटेतील एक अत्यंत अभिनव स्वरुपाचे व तितकेच परिणामकारक आंदोलन म्हणजे वैयक्तिक सत्याग्रह होय.

बीजशब्द : वैयक्तिक, असहकार, सविनय,चळवळ, आंदोलन, सत्याग्रह, बहिष्कार, कायदेभंग, स्वराज्य, काँग्रेस, सत्याग्रही, शिक्षा, युध्दविरोधी, अवस्था.

- - - - -

## प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतात ब्रिटीश सत्तेबद्दल कमालीचा असंतोष पसरला. त्याला विविध कारणे होती. १९०५ मध्ये व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झनने केलेली बंगालची फाळणी, पहिल्या महायुध्दा दरम्यान ब्रिटीश साम्राज्यांतर्गत असणाऱ्या भारताने इंग्लंडला केलेली मदत आणि सरकारने भारतीयांचा केलेला अपेक्षाभंग, रौलेट कायदा, जालियनवाला बाग हत्याकांड (१३एप्रील १९१९), हंटर कमिशन या विविध प्रकरणातून इंग्रजांच्या शोषक नीतीची साक्ष भारतीयांना पटली. याशिवाय १९१९ च्या माँटेग्यु- चेम्सफोर्ड सुधारणा कायद्याने भारतीयांचा भ्रमनिरास झाला होता. वरील सर्व पार्श्वभूमी असहकार आंदोलनाला पर्याप्त ठरली. आणि ४ सप्टेंबर १९२० रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता अधिवेशनात महात्मा गांधीनी असहकार चळवळीचा ठसा मांडला, हा ठराव १८८५ विरुध्द ८८४ मतांनी पास झाला. या ठरावात प्रामुख्याने ९ कलमे होती. आणि या ९ कलमांचे सारभूत तत्व एकच होते ते म्हणजे कोणत्याही परिस्थितीत सरकारसोबत असहकार पत्करणे या ठरावावर २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर १९२० दरम्यान भरलेल्या नागपूर अधिवेशनात शिक्कामोर्तब झाले. नागपूर अधिवेशनात ठरल्याप्रमाणे असहकार आंदोलनाला सुरुवात झाली. सरकारद्वारा मिळालेल्या सन्मानदर्शक पदव्यांचा व अधिकारांचा त्याग, सरकारी समारंभावर बहिष्कार, राष्ट्रीय शाळांची स्थापना, वकिलांचा ब्रिटीश न्यायासनांवर बहिष्कार लष्करी व मुलकी नोकऱ्यावर बहिष्कार, सुधारणा कायदयाखालचा कायदेमंडळावर व मतदानावर बहिष्कार, परदेशी मालावर बहिष्कार, अस्पृश्यता, निवारण हे कार्यक्रम देशभर सुरु होते. असहकार आंदोलनाने भारतामध्ये विराट रुप धारण केले. सर्व भारतात उत्साहाचे वातावरण होते. ब्रिटीश सत्तेविरुध्द भारतीयांनी उग्ररुप धारण केल्याने असहकाराच्या या अभिनव तंत्राने सरकारची झोप उडालेली होती, सरकार गर्भगहीत झाले ही चळवळ यशस्वीतेच्या परमोच्च शिखरावर असतांना ५ फेब्रुवारी १९२२ च्या चौराचोरा घटनेने दु:खी होवून गांधीजीनी चळवळ मागे घेतली. त्यानंतर गांधीजींनी सविनय कायदेभंगाचा १९३० मध्ये



Arts & Science College 160 KURHA

कार्यक्रम जनतेसमोर ठेवला. मिठाचा सत्याग्रह, राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार, परकीय मालावर बहिष्कार, करबंदी, संपूर्ण दारुबंदी, जंगल कायद्याचा भंग, सरकारी नोकऱ्यावर बहिष्कार, न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार १९३० ते १९३४ या काळात संपूर्ण देशात कायदेभंग आंदोलनाला वेग आला. १९३४ मध्ये सविनय कायदेभंग आंदोलन मागे घेण्यात आले आणि पूढील काळात वैयक्तिक सत्याग्रहाची कल्पना महात्मा गांधीनी देशवासियांसमोर मांडली ती अत्यंत अभिनव स्वरुपाची होती.

वैयक्तिक सत्याग्रह :– पार्श्वभूमी

स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नात १९२१ मध्ये पुकारण्यात आलेले असहकार आंदोलन १९२३ पूकारण्यात आलेला झेंडा सत्याग्रह, १९३० मधील सविनय कायदेभंग, १९४२ चे भारत छोडो आंदोलन, क्रांतीकारकांनी स्वराज्य प्राप्तीसाठी केलेले विविध प्रयत्न आणि ध्येयसिध्दीसाठी स्वीकारलेले हौतात्म खरोखरच अत्यंत गहनीय होते. महात्मा गांधी प्रणीत १९४०चा वैयक्ति सत्याग्रहालाही अत्यंत महत्त्व होते.

महात्मा गांधीनी विहित केलेल्या प्रणालीनुसार सरकार विरोधी आंदोलनाच्या लाटेतील एक अत्यंत अभिनव स्वरुपाचे आणि तितकेच परिणामकारक आंदोलन म्हणे वैयक्तिक सत्याग्रह होय. ङ्कसत्याग्रहाचा मार्ग स्फटिकाप्रमाणे स्वच्छ आहे या मार्गाने गेल्यास आपणास एकदा अपयश येईल दोनदा येईल पण एक ना एक दिवस विजय हा मिळणारचफ्र असे गांधीजी म्हणत आणि म्हणून त्यांनी ब्रिटीश सत्तेविरुध्द सत्याग्रह पूकारला या सत्याग्रहांचे स्वरुप सामुहिक न ठेवता त्यांनी वैयक्तीक ठेवले. एकेका व्यक्तीने करावयाचा हा सत्याग्रह असल्याने यास "वैयक्तिक सत्याग्रह" असे म्हणतात.

विनोबा भावे, पं.जवाहरलाल नेहरु, ब्रम्हदत्त, रविशंकर शुक्ल, डी.पी. मिश्रा, सेठ गोविंददास, ब्रिजलाल बियाणी, सी.जे. भारुचा, जमनालाल बजाज या प्रभुतींनी या सत्याग्रहात महत्वाची भूमिका बजावली. या सत्याग्रहातील सर्वात लहान सत्याग्रही म्हणजे महात्मा गांधीनी वर्धा येथील जमनालाल बजाज यांचा लहान मुलगा रामकृष्ण बजाज यांची निवड केली.

खरे पाहू जाता १९४० चा वैयक्तिक सत्याग्रह हा तत्कालीन जागतिक परिस्थितीचा परिणाम होय. या सत्याग्रहाची पार्श्वभूमी प्रथमतः विचारात घेणे आवश्यक आहे. १९३० मध्ये सुरु करण्यात आलेले सविनय कायदेभंग आंदोलन १९३४ मागे घेतले. आंदोलना दरम्यान ज्या नेत्यांना सरकारने अटक केली होती त्यांची मुक्तता करण्यात आली. अशातच १८ जून १९३४ ला वर्धा येथील बैठकीत कौन्सिल प्रवेशाच्या कार्यक्रमाला मान्यता देण्यात आली पुढे १९३५ चा कायदा पारीत करण्यात आला. या कायद्यामध्ये भारताच्या स्वातंत्र्याचा कुठेच निर्देश नव्हता म्हणून अनेकानी या कायद्यावर टीका केली. पंडीत जवाहरलाल नेहरुंनी तर ङ्कशक्तिशाली ब्रेक्स असलेले परंतु इंजिन नसलेले यंत्रफ्रया शब्दात कायद्यावर टीका केली.

१९३५ च्या कायद्यानुसार केंद्रीय आणि प्रांतीय कायदेमंडळाच्या झालेल्या निवडणूकांमध्ये अनेक प्रांतामध्ये काँग्रेसने बहुमत प्राप्त केले. काँग्रेसचे हे यश सत्ताधारी सरकारच्या डोळ्यात आले. १ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने ज्यावेळी पोलंडवर आक्रमण केले त्यावेळी द्वितीय महायुध्दाला सुरुवात झाली त्यावेळी पोलंडच्या रक्षणार्थ इंग्लंड फ्रान्स युध्दात उतरले. अशा वेळी भारतीय नेते आणि जनता यांचे मत विचारात न घेता सरकारने या युध्दात भारताला सहभागी करुन घेतले. त्यामुळे भारतामध्ये असंतोष निर्माण झाला कारण पहिल्या महायुध्दात मोठमोठी आश्वासने देऊन इंग्रजांना युध्दात भारतीयांनी सामील करु घेतले पण युध्द समाप्तीनंतर आश्वासनाची पूर्तता केली नाही. याहीवेळी असेच होणार याची पूर्ण खात्री भारतीयांना होती. या सर्व परिस्थितीवर विचारविनीमय करण्यासाठी १४ सप्टेंबर १९३९ मध्ये वर्धा येथे बैठक आयोजित करुन काही मागण्या समोर केल्या हिंदूस्थानाच्या भविष्याविषयी ब्रिटीश सरकारने स्पष्ट खुलासा करुन युध्दाच्या उद्देशाने घोषणा करावी व भारताला स्वयंनिर्णयाचा अधिकार दयावा पण सरकारने या मागण्याकडे दुर्लक्ष केले.

मार्च १९४० मध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांचे अध्यक्षतेखाली काँग्रेसचे रामगढ येथे काँग्रेसच्या अधिवेशनात सरकार द्वारा होत असणारी जबरदस्तीची सैन्यभरती, आणि जबरदस्ती फंड गोळा करणेया या बाबींचा निषेध करुन ङ्कन एक पाई न कोई भाई न कोई माईफ्रअशा आशयाचे पत्रक वाटण्यात आले, याची सरकारने धास्ती घेतली, सरकारी धोरणाचा नैतिक निषेध म्हणून गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाचा लढा सुरु करण्याचा निर्णय घेतला व सत्याग्रहाची उद्दिष्टे स्पष्ट केली.

वैयक्तिक सत्याग्रह या दोन शब्दातच याचे स्वरुप स्पष्ट होते. हा सत्याग्रह सामुहिक स्वरुपाचा नव्हता त्याचे स्वरुप आतापर्यंत पुकारण्यात आलेल्या चळवळीप्रमाणे नव्हते. द्वितीय महायुध्दाने विध्वंसकारी रुप धारण केले होते म्हणून देशव्यापी आंदोलन करणे अशक्य होते. म्हणून वैयक्तिक सत्याग्रहाची



Arts & Science College 160 KURHA

ISSN (L) 2278 - 4284

कल्पना मांडण्यात आली. १२ ऑक्टोबर १९४० रोजी वर्धेला पार पडलेल्या काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीत या सत्याग्रहाबद्दल चर्चा करण्यात आली त्यावेळी अनेकांना ही कल्पना हास्यास्पद वाटली, तर अनेकांनी या कल्पनेचे उत्स्फुर्तपणे स्वागत केले. महात्मा गांधीनी एक पत्रक काढून आपली भूमीका विशद केली ते म्हणाले ङ्कमाझ्या योजनेचा दोघा सभासदांनी विरोध केला. वर्किंग कमिटीत वादळ झाले. परंतु मी माझ्या योजनेविरुध्द काही करु नका अशी त्यांना विनंती केली. सत्याग्रह एक माणुस करतो की अनेक माणसे करतात हा प्रश्न क्षुल्लक आहे.फ्र१

ङ्कहितवादफ्र वृत्तपत्राने १६ ऑक्टोबर १९४० रोजी महात्मा गांधी यांनी वैयक्तिक सत्याग्रहाकरिता लोकांनी तत्पर राहण्याचे जे आवाहन केले ते 'Gandhiji Explain his plan of Action' या मथळयाखाली प्रसिध्द केले.

महात्मा गांधीनी या सत्याग्रहाचे स्वरुप स्पष्ट करतांना त्याचे कार्यक्षेत्रही स्पष्ट केले. काँग्रेस कार्यकारीणी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी, केंद्रीय आणि प्रांतीय असेम्बलीच्या सभासदांनी सत्याग्रहात योगदान दयावे.अशी इच्छा प्रदर्शित करतानाच त्यांनी ज्यांची अहिंसा मार्गावर नितांत श्रध्दा आहे, आणिज्यांना या आगळयावेगळया सत्याग्रहाचा विचार मनातून पटलेला आहे तसेच स्वराज्यासाठी ज्यांची कष्ट सोसण्याची तयारी आहे त्यांनी या सत्याग्रहात भाग घ्यावा असे नम्र आवाहन केले.

### वैयक्तीक सत्याग्रहाचे तंत्र :

द्वितीय महायुध्द विरोधी प्रचार करणे युध्द कार्यात भाग न घेणे आणि सरकारने दाखविलेल्या कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडणे आणि वैयक्तिरित्या सत्याग्रह करणे इतकेच याचे मर्यादीत स्वरुप होते थोडक्यात ङ्कगांधीजीनी निवडलेला सत्याग्रह युध्दविरोधी प्रचार करेल व जोपर्यंत त्याला अटक होत नाही, तो पर्यंत दिल्लीच्या दिशेने तो पायी चालत राहील. सुटका झाल्यावर तो त्याच पध्दतीने पून्हा सत्याग्रह करेल व स्वत:ला अटक करुन घेईल.

वैयक्तिक सत्याग्रहाच्या निरनिराळया अवस्था होत्या.

### सत्याग्रहाची पहिली अवस्था :

पहिले सत्याग्रही विनोबा भावे सत्याग्रहाकरीता पहिले सत्याग्रही विनोबा भावे, दुसरे सत्याग्रही म्हणून जवाहरलाल नेहरु तर तिसरे सत्याग्रही म्हणून ब्रम्हदत्त यांची निवड करण्यात आली.

महात्मा गांधीच्या शिष्य परिवारात विनोबा भावे यांना महत्वाचे स्थान होते. १९१६ मध्ये गांधीजी आणि विनोबा भावे यांची भेट कोचरब आश्रमात झाली होती. विनोबा भावे हे गांधीजींच्या व्यक्तिमत्वाने प्रभावीत झाले. तितकेच गांधीजी सुध्दा विनोबा भावे यांच्यात आपला शिष्य पाहू लागले. कोचरब, साबरमती आश्रमामध्ये विनोबा महात्मा गांधीच्या सान्निध्यात राहीले. १९२१ मध्ये गांधीजींनी वर्धा येथे सत्याग्रह आश्रम स्थापन केला त्या आश्रमात विनोबांना त्यांनी पाठविले होते. वैयक्तिक सत्याग्रहाकरीता, आदर्श सत्याग्रहींचे सर्वगुण विनोबा भावे यांच्या मध्ये आहे, असे ते म्हणत ते विनोबांना ङ्कआश्रमातील मोतीफ्र असे संबोधत. विनोबा हे अहिंसेचे सर्वोत्तम प्रतिपादक आहे असे ते म्हणत. आणि म्हणूनच त्यांनी पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावेंची निवड केली.

### वैयक्तिक सत्याग्रहाला प्रारंभ

वैयक्तिक सत्याग्रहाच्या कार्यप्रणालीनुसार सत्याग्रहाकरीता एक स्थळ निवडण्यात आले ते म्हणजे वर्धेपासुन ७ ते ८ कि.मी.अंतरावर असलेले पवनार ! १७ ऑक्टोबर १९४०या दिवशी विनोबांनी वर्धा ते पवनार अशी पदयात्रा केली व पवनार गाठले. त्यावेळी शेकडोंच्या संख्येने लोक तिथे उपस्थित होते. त्यांनी प्रथम सत्याग्रही विनोबा भावेंचे स्वागत केले. त्यावेळी त्यांनी वैयक्तीक सत्याग्रहाची भूमिका विशद केली ते म्हणाले, ब्रिटनचे हिंदुस्थानात जे युध्द सहकार्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्या कामी राष्ट्रीय सभा तात्विक मुद्यावर ब्रिटनला सहकार्य करु शकत नाही. ब्रिटनने जी लोकशाही आणि मध्यवर्ती सत्तेत राष्ट्रीय सरकारची मागणी नाकारल्यामुळे युध्दविरोधी प्रचार करणे काँग्रेसला भाग पडले युध्दविरोधी भाषण करणे काँग्रेसला नाकारले आणि युध्दात हिंदुस्थानने स्वत: प्रवेश केला नसून आम्ही हिंदुस्थानला युध्दात ओढले असे जाहीर करण्यात ब्रिटीश सरकार नाही म्हणून हा सत्याग्रह करावा लागत आहे.फ्र३

ज्या प्रमाणे विनोबांनी वर्धा जिल्हयातील पवनार, सुरगांव, देवळी, सेलू येथे केली. आपल्या भाषणांनी प्रजेच्या भावना ते भडकून देतात म्हणून त्यांना सरकारने अटक केली. त्यांना मॅजिस्ट्रेट कुंटे यांच्या न्यायालयात उपस्थित करण्यात आले त्यावेळी सब इन्स्पेक्टर चावजी यांनी सरकारची बाजू मांडली. विनोबांची भाषणे ती युध्दकाळात सरकारसाठी अडथळा निर्माण करीत आहे. असा युक्तीवाद केला. विशेष म्हणजे यावेळी विनोबांनी कोणत्याही युक्तीवाद केला नाही त्यांना तीन महिन्यांनी शिक्षा दिली आणि नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात त्याची रवानगी



Arts & Science College 160 KURHA

ISSN (L) 2278 - 4284

करण्यात आली.

दुसरे सत्याग्रही

वैयक्तिक सत्याग्रहाचे दुसरे सत्याग्रही पंडित नेहरु यांची निवड महात्मा गांधीनी केली होती. ते दिल्ली येथून सेवाग्रामला आलेत. ७ नोव्हेंबर १४४० हा दिवस त्यांनी सत्याग्रहाकरिता निश्चित केला. परंतु सेवाग्रामवरुन परत जात असतांनाच सरकारने त्यांना ३१ ऑक्टोबर १९४० रोजी अटक केली व चार महिन्यांची शिक्षा ठोठावली.

पंडित नेहरुनंतर तिसरे सत्याग्रही ब्रम्हदत्त यांनी सत्याग्रहाला सुरुवात करताच त्यांना अटक करुन ६ महिन्याची शिक्षा दिली. अशा वेळी वर्धा येथील जमनालाल बजाज यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांचेकडे आपली वैयक्तिक सत्याग्रहाकरीता निवड करण्यात यावी अशी विनंती केली. आझाद यांनी त्यांना सत्याग्रह करण्याची अनुमती दिली. सत्याग्रह सुरु करण्यापूर्वी त्यांनी जिल्हा मॅजिस्ट्रेट अर्ज भरुन दिला त्या अर्जाचे स्वरुप असे होते.

"The District Magistrate

_________ place

Dear Sir,

I am a Satyagrahi approved by Mahatma Gadhi. I will offer Satyagrah from _______ village on______ I will apose war policy of the British Government by uttering anti war stogns and I will expain the people that only non violence opprsition can end the war and imperialism"

अशा प्रकारचा अर्ज जमनालाल बजाज यांनी सादर केला आणि युध्दाविरोधी प्रचार केला म्हणून सरकारने त्यांना अटक केली आणि जस्टीस कुंटे यांचे न्यायालयात उपस्थित केले. त्यांना न्यायालयाने ९ महिन्यांची सक्तमजुरी व ५०० रुपयाचा दंड ठोठावला त्यांची रवानगी नागपूर कारागृहात करण्यात आली.

सर्वात लहान सत्याग्रही – रामकृष्ण बजाज

वैयक्तिक सत्याग्रहाचे सर्वात लहान सत्याग्रही रामकृष्ण बजाज हे होते. ते जमनालाल बजाज व जानकी देवी बजाज याचे पूत्र होते. त्यांनी गांधीजीकडे अनेकदा माझी सत्याग्रही म्हणून निवड करावी अशी मागणी केली पण गांधीजीनी त्याकडे दुर्लक्ष केले. परंतू पुढे या बालकाचा आग्रह व सत्याग्रहाकरीता असणारा निग्रह ते मोडू शकले नाही व त्यांची सत्याग्रहाकरिता निवड केली.

रामकृष्ण बजाज यांनी सत्याग्रहास सुरुवात केली त्यावेळी प्रथमतः त्यांना १०० रु. चा दंड देण्यात आला. पून्हा सत्याग्रह करताच २०० रु. आणि तिसऱ्या वेळी सत्याग्रह करताच चार महिन्यांची सजा चौथ्या वेळी सत्याग्रह केला त्यावेळी सहा महिन्यांची सजा देण्यात आली आणि नागपूर कारागृहात त्यांना ठेवण्यात आले. तिथे ते ङ्कबीफङ्कश्रेणीचे कैदी होते तर त्यांचे वडील जमनालाल हे ङ्कएफङ्क श्रेणीचे कैदी होते.

या वैयक्तिक सत्याग्रहाच्या निरनिराळया अवस्था होत्या.

१. पहिली अवस्था :– विनोबा भावे, पंडीत नेहरु, ब्रम्हदत्त यांनी सत्याग्रह करुन ब्रिटीशांच्या युध्द प्रयत्नांना विरोध केला.

२. दुसरी अवस्था :–कॉंग्रेस कार्यकारीणी प्रांतीय व केंद्रीय असेंबली चे सभासद यांनी हा सत्याग्रह केला. या अवस्थेत ङ्कहिंदूस्थानचे प्रथम श्रेणीचे नेते ११, कॉंग्रेस कार्यकारीणीचे सदस्य १७६, अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सदस्य भूतपूर्व मंत्री ३६ आणि ५०० प्रांतिक आणि केंद्र विधानसभा सदस्य यांना प्रत्येकी एक वर्षाची सक्त मजुरांची शिक्षा देण्यात आली.

३. तिसरी अवस्था :–ज्यांनी इच्छा व्यक्त केली ते सत्याग्रही जवळपास साडेचार ते पाच हजार सत्याग्रही या अवस्थेत पकडले गेले. जमनालालजीनी पुकारलेला सत्याग्रह या अवस्थेतील होता.

४. चौथी अवस्था :–गावागावांमध्ये युध्दविरोधी प्रचार करुन चलो दिल्ली लडाई मे मदद देना हराम है अशा घोषणा सत्याग्रही देत रामकृष्ण बजाज यांनी पूकारलेल्या सत्याग्रह या अवस्थेतील केला.

१ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने पोलंडवर आक्रमण केल्यानंतर द्वितीय महायुध्दाला सुरुवात झाली. या युध्दात भारतीय नेत्यांची मत विचारात न घेता भारताला समाविष्ट करुन घेतले आणि भारत अंतःकरणपूर्वक मदत करीत आहे. सरकारने केलेला दावा केला. आणि म्हणून गांधीजींनी या युध्दाचे काही सोयरसुतक नाही व्हाईसरायला पत्र लिहून ङ्कयुध्दात नाझीवादाचा विजय होण्याला कोणाही ब्रिटीश नागरिकाचा जितका विरोध असेल तितकाच आमचा आहे. ज्याअर्थी तुम्ही व भारतमंथ्यानी जाहीर केले आहे की, भारत स्वखुशीने युध्द प्रयत्नाला मदत करीत आहे त्या अर्थी आम्हाला हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, भारतातील बहुसंख्य जनतेला या युध्दाचे काही सोयरसुतक नाही. नाझीवाद व भारतावर राज्य करणारी दुहेरी राजेशाही यात भारतीयांना काही फरक वाटत नाही.



Arts & Science College 160 KURHA

ISSN (L) 2278 - 4284

आणि याच पार्श्वभूमीवर त्यांनी वैयक्तिक सत्याग्रह सुरु केला. या सत्याग्रहात ऑक्टोबर १९४० ते डिसेंबर १९४१ च्या शेवटपर्यत २५००० ते २६००० लोकांना सरकारने अटक केली. या सत्याग्रहाला स्त्रियाही मोठया प्रमाणावर सहभागी झाल्यात, प्रमिलाताई ओक, शरयुताई धोत्रे, दमयंती धर्माधिकारी, ताराबेन मधुबाला यांचा समावेश होता.

समारोप :

सविनय कायदेभंग आंदोलनानंतर महात्मा गांधीनी वैयक्तीक सत्याग्रह आंदोलन सुरु करुन ब्रिटीश सत्तेसमोर आव्हान दिले. व्हाईसरॉयच्या कौन्सिलमध्ये असणाऱ्या अनेकांनी या सत्याग्रहाला विरोध केला. बापूजी आणे, स्वातंष्यवीर सावरकर यांनी भारतीय तरुणांनी सैन्यात भरती व्हावे असा प्रचार सुरु केला. पण त्याचा तसूभरही परिणाम सत्याग्रहींवर झाला नाही आणि सत्याग्रह करुन त्यांना शिक्षा भोगली, देशासाठी तुरुंग म्हणजे तीर्थक्षेत्र हया भावनेने प्रेरित होवून त्यांनी तुरुंगवास पत्करला हीच या सत्याग्रहाची फलश्रृती आहे.

निष्कर्ष :

१. महात्मा गांधीनी अहिंसा या तत्वाचा स्वीकार करुन विविध चळवळी केल्यात, त्यापैकी असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आंदोलन यांचा विशेत्वाने उल्लेख करणे आवश्यक ठरेल.
२. द्वितीय महायुध्दविरोधी प्रचार करणे, सरकारने दाखविलेल्या कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडणे आणि वैयक्तिकरित्या सत्याग्रह करणे असे वैयक्तिक सत्याग्रहाचे स्वरुप होते.
३. द्वितीय महायुध्द काळात देशव्यापी आंदोलन करणे अशक्य आहे हे ओळखून वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले.
४. वैयक्तिक सत्याग्रह हा एकटयाने करण्याचा सत्याग्रह होता. ज्यांची अहिंसा मार्गावर श्रध्दा आहे आणि ज्यांना हा विचार मनोमन पटलेला आहे. त्यांनी हा सत्याग्रह करावा असे ठरविण्यात आले, त्या प्रमाणे अशा अनेक लोकांनी या सत्याग्रहात सहभाग घेतला.
५. सरकारने या सत्याग्रहात सामील झालेल्या सत्याग्रहींची धरपकड केली व त्यांना तुरुंगात डांबले.पण सत्याग्रहीवर त्याचा किंचीतही परिणाम झाला नाही.

संदर्भ टीपा :

१. बैस डॉ. विरेंद्र – वर्धा जिल्हयातील स्वातंष्य आंदोलनाचा इतिहास पृ.८३
२. कोलारकर डॉ.श. गो. – विदर्भाचा आधुनिक इतिहास पृ.१८३
३. बैस डॉ. विरेंद्र – वर्धा जिल्हयातील स्वातंष्य आंदोलनाचा इतिहास पृ.८५
४. कित्ता पृ.९०
५. कोलारकर डॉ.श. गो. – विदर्भाचा आधुनिक इतिहास पृ.१८६
६. बिपीनचंद्र (अनु.पारधी मा. कृ.) स्वातंष्याचा लढा पृ.१५०

संदर्भ ग्रंथसूची :

१. बैस डॉ. विरेंद्र – वर्धा जिल्हयातील स्वातंष्य आंदोलनाचा इतिहास
२. कोलारकर डॉ.श. गो. – विदर्भाचा आधुनिक इतिहास
३. बैस डॉ. विरेंद्र – वर्धा जिल्हयातील स्वातंष्य आंदोलनाचा इतिहास
४. कित्ता
५. कोलारकर डॉ.श. गो. – विदर्भाचा आधुनिक इतिहास पृ.१८६
६. बिपीनचंद्र (अनु.पारधी मा. कृ.) स्वातंष्याचा लढा पृ.१५०

***

Principal
Arts & Sci. College
Kurha

Impact Factor 5.604
www.sjifactor.com

p-ISSN 2454-7409
e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष सातवे अंक दुसरा जानेवारी २०२२
Vol. 7 Issue 2
Jan. 2022
Regular Issue

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## MPSP

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Annual National Indexed Research Journal
in Marathi
Published as per UGC (India) Guidelines

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

# अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री चित्रणे

डॉ. निशा जोशी
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

गोषवारा —

अज्ञानाने आणि दारिद्रयाने पीडित गरीब,दलित स्त्रियांचे जगणे समाजामध्ये दिसत होत. त्यांच जगण समाजापुढे मांडणे अण्णाभाऊ साठे यांना गरजेचे वाटले. परिणामी त्यांनी त्यांच्या साहित्यातून स्त्रियांचे चित्रण केले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी एकूण पसतीस कादंबरीचे लेखन केले. यामध्ये त्यांनी निरीक्षण केलेल्या व ते ज्या समाजामध्ये जगत होते त्या समाजात आलेल्या अनुभवावरुन स्त्रियांचे चित्रण केले आहे. याबाबत त्यांनी 'आबी' च्या प्रस्तावनेत म्हटले आहे की,—'जे जीवन मी जगलो, जे जीवन अनुभवले तेच मी लिहीत आहे.' ज्या माणसांची दु:खे, व्यथावेदना, त्यांनी चितारली ती त्यांची होती. ती कल्पनेतल्या जगातली नव्हती. माणुसकीसाठी, *अन्नासाठी, बेभान झालेल्या या स्त्रियांच्या वृत्ती कधी—कधी वाचकांना भडक व खोटया वाटतात.* पण अठराविश्वे दारिद्रयात मातंग समाजाची स्त्री जगत होती. तिला आर्थिक स्वातंत्र नव्हते, ती स्वत:च्या पायावर उभी नव्हती. म्हणुन ती वाचकांना बेताल, बेबंद, व मर्यादा सोडुन वागणारी वाटली. परंतु अन्याय जुलुमाच्या रगाडयात सापडलेली माणसे मग ती स्त्री असो की, पुरुष सहनशीलतेचे बंध झुगारुन असेच बंड करतात. त्यावच दर्शन अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या कादंब—यातुन केले आहे. त्यापैकी आवडी, रुपा, चित्रा या नायिकाप्रधान कादंब—यांचा या पेपर मध्ये विचार करणार आहे.

बीजशब्द — अण्णाभाऊ, कादंबरी, स्त्री चित्रणे, साहित्यविषयक दृष्टी

## प्रस्तावना —

कादंबरी हा वाड्मय प्रकार जीवनाचं अत्यंत सखोल आणि साकल्यानं दर्शन घडविणारा वाङ्मय प्रकार आहे, आजपर्यंत अनेक विषयांवर कादंबरी या साहित्य प्रकाराच्या माध्यमातून मानवी जीवनाचं अत्यंत मार्मिक असं वर्णन केल्या गेलेले आहे. कादंबरी म्हटली की आपल्या डोळयासमोर उभा राहतो ती जीवनातील बारीक सारीक तपशील व कंगोरे घेवून येणारी कथा. म्हणूनच मानवी जीवनात कादंबरीला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दलित कादंबरीचा विचार करतांना प्रकर्षाने जाणवते ते त्या कादंबरीतील चित्रित होणारे वास्तव होय. कारण मुळात दलित साहित्य जन्माला आले तेच मुळी सांस्कृतिक उठावाचे विद्रोही शब्दरुप घेवून. ते स्वाभाविक आहे, पिढयानपिढयापासून असहायतेच्या गर्तेत सापडलेल्या समाजाला जेव्हा शब्द सापडतात तेव्हा ते शब्द न राहता क्रांतिकारी तत्वज्ञानाच्या रुपाने आविष्कृत होतात.

## विषय विवेचन —

अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीचा विचार करतांना लक्षात येते ते तिचे प्रभाविपण. अण्णा भाऊ साठे यांच्या चित्रा, रुपा, आवडी या तीन कादंबरीतील स्त्री चित्रणांचा व त्याअनुषंगाने कादंबरी निर्मितीच्या अंगाने विचार करणार आहे. त्यांच्या साहित्य निर्मिती संदर्भात ते स्वत: म्हणतात की, मी जे जीवन जगलो, जगत आहे नि जे अनुभवल आहे, तेच ते लिहितात. सत्य रेखाटतांना भोवतालचे वातावरण ते इतके जिवंत करतात की, वाचतांना अंगावर रोमांच तरी उठावेत अथवा घाम तरी फुटावा. त्यांच्या कादंबरीतील विचारी आणि विकारी मनाचे दर्शन घडवितांना अण्णा भाऊ साठे कधीही स्वप्नसृष्टीत रमत नाहीत. जगण्यासाठी लढणा—या माणसांची कथा ते सांगतात. त्यांच्या कादंबरीत निरनिराळी माणसे रंगविली आहेत. पण सर्वांच्या रक्तातून एकच लढावू इर्षा वहातांना दिसते. मग ते स्त्री पात्र असो की, पुरुष पात्र असो. अंगात असेल नसेल तेवढे बळ एकवटून त्यांना आक्रमक वृत्तीशी सामना द्यायचा आहे आणि त्यामध्ये जिंकायचे देखील आहे. दैन्य, दारिद्रय हयांनी कावलेल्या आणि खंगलेल्या जीवनात जी विसंगती आणि अपूर्णता निर्माण होते, त्यातच त्यांच्या विनोदाचे बीज रुजले आहे.



Arts & Science College 160

वास्तवतेला फाजील महत्व देणारा म्हणून काही मित्र त्यांच्यावर रागावतात, पण ते त्यांचा राग मानीत नाही आणि आपला खाक्या देखील बदलत नाही. वास्तवता आणि कल्पकता यांचा मेळ कसा घालावा हा एकच यक्ष प्रश्न त्यांच्यापुढे असतो. असे आवडी कादंबरीच्या प्रस्तावनेत नमूद करतात.

आवडी:— आवडी ही अण्णा भाऊ साठे यांची अकरावी कादंबरी आहे. या कादंबरी असलेल्या पात्रांबाबत ते माझी माणसं असा शब्दप्रयोग करतात. त्यामधून त्यांची साहित्यविषयक दृष्टी लक्षात येते. या कादंबरीला शब्दरुप देण्यापूर्वी अण्णाभाऊ साठे यांनी चार वर्ष विचार केला. कारण 'आवडी' चे प्रेत गोरीतून बाहेर काढले तेव्हा प्रचंड देहाचा धनाजी लहान मुलाप्रमाने रडत होता. त्या प्रसंगाचा परिणाम म्हणून या कादंबरीचा जन्म झाला.

'आवडी' ही तांदळगावच्या तात्याबा चौधुला पाटलाची मुलगी, तात्याबा पाटलाचं घर आनंदान भरलं होत. त्याच्याकडे पोटापुरती जमीन, चार बैल, गाई, म्हशी, मेंढरं, कोंबडया याला काही कमी नव्हते. त्याची मोठी मुलगी सारजा नांदगावात सुखी होती. तिच्या पाठचा नागू पहिलवान म्हणून ख्याती पावला होता. तो फड गाजवित होता. तर कधी कुस्ती न खेळता खंडणी सारखी रक्कम घेवून येत होता. नागूनं कुस्ती केली की, तात्या व आवडी यांना आनंद आणि अभिमान वाटत होता. आवडी भावाला ओवाळत होती. बहिणीवर माया करणारा हाच नागू तिच्या जिवावर उठतो, हे असे का घडते? या प्रश्नाचे उत्तर आपल्या समाज रचनेत आहे.

आवडी ही दिसायला सुंदर, त्यामुळे तात्याबाला तिचा अभिमान होता. तिच्यासाठी वर शोधतांना तो म्हणत होता ''कुरीन पैसा पेरीन, पण आवडीला साजंसाच नवरा शोधीन. मेंढराच्या अंगावर लोकर पुष्कळ असते, म्हणून का कोणी त्याच्या गळयात माणिक बांधतं? मेंढरु ते मेंढरु आणि मोर तो मोर!''[4] असे म्हणत. आलेल्या पाहुण्यांना मुलगी पसंत पडली तरी तात्याबाला मुलगा पसंत पडत नव्हता. आवडीवर नागुचा फार जीव होता. तो तिचे लाड करीत असे कुस्तीवरुन येतांना तिच्यासाठी पेढे आणीत असे. तांदळवाडीच्या धनाजी येतो, त्याला पाहून आवडी दिपल्यासारखी होते. हे धनाजी हेरतो आणि हिच गोष्ट नागुला आवडत नाही. तो बोरगावच्या भगवंतराव पाटलाच स्थळ आवडीसाठी आणतो, त्यांचा मुलगा उत्तम देखणा तरुण असल्याने तात्याबाला पसंत पडतो. पण त्याला मिरगी येते हे माहित असूनही नागू घरी सांगत नाही. लग्न झाल्यावर आवडीला कळते. ती त्याच्याशी संबंध ठेवत नाही. बंड पुकारल्यासारखी वागते. माहेरी परत येते, पण 'दिल्या घरी नाहीतर व्याल्या घरीच मेल पाहिजे'. असे म्हणून तिला सासरी पाठविल्या जाते. पण तिला उत्तमची भीती वाटते कारण त्याला फेफर आलं की त्याच्या हाती जे लागेल त्याचा चक्काचूर करायचा. जळतं, पेटतं, कुढतं नांदू लागली. अशातच एक दिवस धनाजी वाडयात आला. तिचा जीव भेटीसाठी आतूर झाला. उत्तमला शेतात जेवण देण्याच्या निमित्ताने ती धनाजीला भेटू लागली. धनाजीच्या 'तूप नि पत्रावळ दोन्ही हवं!' या संकेताला होकार दयायला सिद्ध झाली. आवडी कायमची धनाजीकडे आली.

आवडीच्या या निर्णयाने सासर व माहेर दोन्हीकडे वणवा पेटला. रामोशाच्या घरी आवडी गेली हे पाटील समाजाला पटल नाही. त्यासाठी बैठका झाल्या पण आवडीला पाटील समाजाच्या हवाली करायला धनाजी तयार झाला नाही. कारण पाटील समाज तिला मारायची भाषा करीत होता. उलट धनाजी 'भीतीनं खचून जाणारी औलाद नव्हं. मी आवडीच्या मानेवर मान तोडून घेऊन मरणार''[5] असे म्हणाला. धनाजीची ती नेकी, प्रेम करण्याची झुंझार रीत पाहून ती सुखावली. पण नागूच्या मनात काही निराळेच बेत शिजत होते. त्याने मोठी बहिण सारजाला हाताशी घेवून कट रचला. बहिणीच्या सुखापेक्षा घराण्याची इज्जत मोलाची वाटत होती. सारजा आवडीच्या घरी आली. तिने प्रेमाचे नाटक केले, आणि आवडीला नागूच्या हवाली केले. ज्या बहिणीवर माया केली त्याच बहिणीचा नागुने कु—हाडीने खून केला.

रुपा:—रुपा ही अण्णा भाऊ साठे यांची स्त्री प्रधान कादंबरी आहे. अण्णा भाऊ साठेच्या इतर कादंबरीतील नायिकांप्रमाणे रुपा देखील दिसायला सुंदर आहे. आई नानुबाई आणि वडील आबाजी यांची लेक असणा—या रुपाचे वेड गावातील तरुण पोरांना लागले आहे. गजा नांगरे नावाचा गावातील टारगट पोरगा तिच्या मागे हात धुवून लागतो. तिला आपल्या ताब्यात करण्यासाठी तो गावातील मथी नावाची बाई हाताशी घेतो. मथी ही शिरगावात आघाडीची कुंटीण समजली जात होती. गजा तिला पैसे देउन रुपाला फितवण्याच्या कामगिरीवर पाठवतो. मथीबाई तिला एकांतात गाठून आपलं कुंटीणीचं कसब पणाला लावते. ''तू पैशाची काळजी करु नग. मी पैसं कुरानं पेरीनं. मातर........''[3] असे गजा तिला म्हणतो. रुपा आणि मथी यांच्या सारख्या गाठीभेटी वाढत चालल्या. तर इकडे रुपाच्या घरी नानुबाई आबाजीला रुपाचे लग्न आता जमले पाहिजे असे सारखी बजावत असते. शिरगावातील दिनकरचा स्वभाव रुपाला आवडत होता, कारण तो उथळ नव्हता आणि काटेकोर वागत होता. पण मथीला रुपा



Arts & Science College
160

भेटते हे कळल्यापासून तो नाराज होता. तिला म्हणाला "आणि ऐक. जेव्हा तुझा कडेलोट होउन तू नरकात जाशील आणि आबाजी खोताच्या तोंडाला डांबर फासून मोकळी होशील त्या दिवशी ती वेळ येणार आहे"[४] दुसरीकडे गजा रुपाला कसे कुठे गाठावे याचा विचार करीत होता. प्रसंग पडला तर कु—हाडीने मुडदे पाडायची तयारी करीत होता. तर दिनकर बंदूक भरुन गजाला मारण्यासाठी तयार होता.

दिनकर आणि गजा नांगरे हे दोघे जिवाभावाचे मित्र होते. दिनकरचे रुपावर प्रेम आहे, हे गजाला माहित असूनही तो रुपाच्या मागे लागतो. दिनकर आणि गजा याच्यात मारामारी होते. दिनकर गजाला बंदुकीच्या दस्त्यानं मारतो. त्यामुळे डंगारणे आणि नलावडे यांच्यात लढाईची तयारी सुरु होते, दोन्ही गट समोरासमोर उभे ठाकतात. परंतु धोंडीबाच्या समजुतदारपणामुळे युद्ध टळते. परंतु दिनकर आणि गजातील वैर मात्र कायम राहतेच. गजा "मी रामराव नलावडयांचा निर्वंश करीन तरच डंगारण्याचं नाव सांगेन"[५] अशी प्रतिज्ञा करतो. तसे प्रयत्नही करतो, पण अपयशी होतो. शेवटी प्रकरण मिटते दिनकर आणि रुपा यांचा विवाह होतो. पण दिनकर रुपाच्या लग्नाच्या वरातीमध्ये दिनकरला मारण्याचा कट गजा करतो. दिनकरवर बंदुकीचा नेम धरतो पण त्याचे मित्र सावध असतात, म्हणून त्याचा कट फसतो व गजा पकडला जातो. त्याला पोलीसांच्या ताब्यात दिले जाते.

चित्रा:— चित्रा ही अण्णा भाऊ यांची एक स्त्री प्रधान कादंबरी आहे. या कादंबरीच्या जन्मकथेबाबत स्वत: अण्णा भाऊ म्हणतात की, "क—हाड —कोल्हापूर सडकेला एक भाची व एक मामा अशी दोन माणसे भेटली. त्याचवेळी एका तरुणीच्या जीवनाचे धागे सापडले"[६] पण पुढे हीच तरुणी आपल्या कादंबरीची नायिका होईल याची मात्र त्यावेळी त्यांना कल्पना नव्हती. त्या दारिद्रयाने होरपळून निघालेल्या तरुणीचे पुढे काय झाले असेल हा प्रश्न आणि त्या तरुणीचा जीवनावरचा दुर्दम्य विश्वास या दोन गोष्टी कादंबरी जन्माला येण्याला कारणीभूत झाल्या.

कादंबरीची नायिका 'चित्रा' ही आईच्या पोटात असतांनाच तिचे वडील वारले. आई सखुबाईने सोनाला घेऊन माहेरची वाट धरली. माहेरी भाऊ आपल्याला दूर लोटणार नाही हा सखुबाईचा विश्वास होता. काही दिवस भाऊ कृष्णाने मदत केली. तो तरी काय करणार कारण तो स्वत: काम करीत नव्हता त्याच्या दोन बायका राबराबून त्याला आणि सहा मुलांना पोसत होत्या. सखुबाई व मुलींची दारिद्रयाने अन्नान दशा झाली. वृद्धापकाळामुळे सखुबाईकडून काम होत नव्हते. दोघी बहिणी लोकांचे दळनकांडण करुन घर चालवत होत्या. तर दिसायला सुंदर असल्याने गावगुंड हात धुवून मागे लागले होते. आळीतील लोक सखुबाईला दोष देऊ लागले. तिही मनात झुरत होती. तिने कृष्णाला गळ घातली की कसेही कर मुलींच्या लग्नाचे पहा. तेव्हा कृष्णाने मुलगा पाहिला सोनाचे लग्न लावून दिले. पण तिचे दुर्दैव काही पाठ सोडत नव्हते. कारण ज्या वराशी तिचे लग्न लावले त्याला महारोग होता म्हणून त्याने दुस—याच दिवशी एवढी सुंदर बायको मला नको मला सोडचिठ्ठी दया अशी पाटलाला गळ घातली, आणि सोनाची सोडचिठ्ठी झाली. पुढे कृष्णा मुंबईला गेला अणि सांगु लागला की तो सोनाचे लग्न ठरवून आला. पण खरे संकट तर पुढेच आहे याची कोणालाच कल्पना नव्हती. कारण कृष्णाने सोनाला वेश्या व्यवसायाकरिता पैसे घेऊन विकली होती.

सोना पैसा पाठवत होती आणि कृष्णा मजा मारीत होता. सखुबाईचे दारिद्रय तसेच होते. सोनाच्या पैशावर चित्राचे लग्न तो जमवतो. लग्न पार पडते पण दुस—याच दिवशी तिचा नवरा चंदुच्या कानात गोम जाते तो वेदनेने तडफडून मरतो. 'जावा खरं, पन आपली मुलगी बी घेवून जावा. आता तिला कोन धनी हाय!'[७] अशी तीची सासु म्हणते व चित्रा परत माहेरी येते. बाप्या पवार नावाचा गावातील टारगट माणूस चित्रासाठी वेडा झाला, तो बनीला चित्राला पटविण्यासाठी सांगतो. सोनाने पाठविलेल्या पैशाच्या पावसाने चिंब भिजलेला कृष्णा आता चित्राला मुंबईला पाठविण्याचे स्वप्न पाहू लागला. घरावर सोन्याचे कवेलू टाकण्याचे मनसुबे रचु लागला. सोनाच्या पैशावर कृष्णा मजा करीत होता, पण सखुबाई आणि चित्रा मात्र दोन वेळच्या जेवनाला मोताद होत्या. ही वास्तवता सोनाला माहितच नव्हती. उलट कृष्णा चित्राविषयी सोनाचे कान भरत होता.

कृष्णा चित्राला घेवून मुंबईला पोहचतो. तिथे गेल्यावर चित्राला कळते की, सोनाचे लग्न झाले नसून मामाने सोनाला विकले आहे. त्यामुळे तिला मामाचा राग येतो. सोनाला तर त्याला हाकलून द्यावे वाटते पण दुखवल्याने तो आईला छळेल म्हणून ती गप्प बसते. दोघी बहिणी मुंबई पाहतात. पण चित्राचे दुर्दैव इथेही पाठ सोडत नव्हते. तिथे लाल्या तिला वाइट नजरेने पाहत होता. सोनाने तिच्याकडे येणारा सोन्याचा व्यापारी कांतीलाल सेठला सोनाशी ओळख वाढवून लग्न करायला राजी करते. तो एक सज्जन म्हणून तिला चित्राचे त्याच्याबरोबर लग्न व्हावे असे वाटते. त्या हेतूने कांतीलाल प्रयत्न करतो. त्याचवेळी जनरल देखील चित्रासाठी वेडा होतो. चित्राला मात्र आईने सांगितलेला 'जिवाच्या मोलानं अब्रु जप' हा सल्ला आठवत असतो. कांतीलाल चित्राला



Arts & Science College
160

फिरायला नेतो, चित्रपट दाखवतो. पण एकदाही मर्यादा सोडून तो वागत नाही म्हणून तिला तो आवडायला लागतो. तो एक दिवस चित्राला फिरायला नेल्यावर तू माझी होशील का असे विचारतो. चित्राला आनंद होतो पण दुस—या क्षणाला तो आनंद नाहीसा होतो, कारण तो तिला सांगतो की, त्याच्याकडे पुरुषत्व नाही. 'शेतीआड चोरी आणि नव—याआड शिंदळकी' करायला परवानगी देणारा हा माणूस माणूसच नाही. असे तिला वाटते, तिला त्याचा राग येतो.

चित्रा सोनाकडून निघुन जाते. पण जायचे कुठे हा प्रश्नच असतो. तिला आठवते की, तिच्या गावातील तानुकाकु माटुंगा लेबर कॅपला राहते. चित्रा टांगा करुन माटुंग्याला जाते. तिथे ती तानुकाकु बरोबर मिलमध्ये कामाला जाते. तानुकाकुचा नातु जया तिचा लहानपणीचा सवंगडी आहे. तिला तो आवडायला लागतो. खलाशी संप करतात, त्यांना साथ देण्यासाठी मीलमधील कामगार पण संप करतात. संप मोडून काढण्याचा सरकार पुरेपुर प्रयत्न करते. त्या चकमकीत जया जखमी होतो. त्याला दवाखाण्यात पहायला तानुकाकु व चित्रा जातात. तिथे जखमी सोनाला भरती करायला आणले असता दोघी बहिणींची भेट होते. तानुकाकु दवाखाण्यातच चित्रा व जयाचे लग्न होणार हे जाहिर करते.

या कादंबरीबाबत एका मित्राने 'या कादंबरीत कल्पकता किती आहे आणि वास्तवता किती आहे.' असे विचारले असता अण्णा भाऊ म्हणतात की, या भांडवली जगात कल्पनेलाही लाजवणारी वास्तवता वावरत आहे पण ती वास्तवता भयंकर असते आणि त्या वास्तवतेतूनच माझ्या हया कादंबरीचा जन्म झाला आहे, असे ते म्हणाले.

## निष्कर्ष —

अण्णाभाऊ साठे यांच्या आवडी, रुपा, चित्रा या नायिकाप्रधान कादंब—यांचा अभ्यास केला असता, समोर आलेले निष्कर्ष असे की, त्यांनी त्यांच्या कादंब—यातून चित्रित केलेल्या नायिकांमुळे मातंग समाजातील स्त्रियांचे जीवन समाजापुढे आले आहे. त्यांचे साहित्य समताधिष्ठीत असून सामाजिक परिवर्तनाला दिशादर्शक ठरले आहे. ही स्त्री आत्मशोध घेण्यास प्रवृत्त झाली. व तिच्या अस्मितेचा हुंकार या पुढील काळात निर्माण झालेल्या साहित्यामधून अभिव्यक्त झाला. कादंब—यांमधून आवडी, रुपा, चित्रा या स्त्रिया त्यांच्या समाजातील स्त्रियांचे प्रतिनिधीत्व करतात.

## संदर्भ —

१ 'आवडी' अण्णा भाऊ साठे, सुरेश एजन्सी, सहावी आवृत्ती पृ. २४
२ 'आवडी' अण्णा भाऊ साठे, सुरेश एजन्सी, सहावी आवृत्ती पृ. ५७
३ 'रुपा' 'आवडी' अण्णा भाऊ साठे, अक्षय प्रकाशन, आ. २०१६, पृ ८
४ 'रुपा' 'आवडी' अण्णा भाऊ साठे, अक्षय प्रकाशन, आ. २०१६, पृ १३
५ 'रुपा' 'आवडी' अण्णा भाऊ साठे, अक्षय प्रकाशन, आ. २०१६, पृ ३५
६ 'चित्रा' प्रस्तावना, अण्णा भाऊ साठे, विद्यार्थी प्रकाशन
७ 'चित्रा' अण्णा भाऊ साठे, विद्यार्थी प्रकाशन पृ. २२

❖❖❖

Arts & Science College 160 * KURHA *
Principal
Arts & Sci. College
Kurha

2021-22



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

Jan. To March 2022
Issue 41, Vol-02

Date of Publication
01 Jan. 2022

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Arts & Science College 160 KURHA

# INDEX

01) JOB SATISFACTION AMONG EMPLOYEES WORKING IN PRIVATE SECTOR BANKS
**Dr. Kamaljeet Kaur Bhatia, Indore** ||10

02) "RISING EDIBLE OIL PRICES IN INTERNATIONAL AND DOMESTIC MARKET"...
**Dr. H.B. Gupta & Miss Shivangi Pathak, Bhopal** ||15

03) Challenges of goods and services Tax in India
**Jyotsana Soni** ||22

04) Building a Strong India: The Imperative of Uniform Civil Law
**Dr. Vibha P. Deshpande, Kurha** ||25

05) Synthesis of some 2,5-disubstituted derivative of 1,3,4-Triazole and their ...
**SHABINA PERWEEN & DR. ADITYA KR. LAL DAS, MADHUBANI** ||28

06) IMPORTANCE OF CONCEPTS IN SCIENCE TEACHING
**Dr. Sandip Kumar Srivastava, Gonda, U.P.** ||31

07) Study Of Emotional Stability of Adolescents with reference to National ...
**Tanu & Dr. Shivani Shrivastava, Indore** ||34

08) Mass Marriage as the Economy Marriages
**Mrs. M.F. Wadekar & Dr. G.K.Boodeppa, Belagavi, Karnataka state** ||38

09) Protection From Environmental Pollution: A Case Study
**Dr. V. L. Phad, Parli-Vaijnath (M.S.)** ||45

10) महात्मा फुले – लोकशिक्षणाचे शिल्पकार
प्रा.डॉ. आहेर डी.के., मुखेड ||49

11) वृध्दांच्या समस्या व उपाययोजना
डॉ.सुरेश बन्सपाल, जि.भंडारा (म.रा.) ||51

12) माणकेश्वर शिवमंदिर – हेमाडपंतीय मंदिर शैली – एक अभ्यास
डॉ. विजयकुमार प्रल्हादराव भांजे, जि. उस्मानाबाद ||55

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Arts & Science College * KURHA * 160

04

# Building a Strong India: The Imperative of Uniform Civil Law

Dr. Vibha P. Deshpande
Arts and Science College, Kurha

**********

**Introduction:**

India, a diverse and dynamic nation, stands at the threshold of immense growth and development. However, one critical challenge it faces is the lack of a uniform civil law that governs personal matters, such as marriage, divorce, inheritance, and adoption, for its citizens. Currently, India operates under a complex web of personal laws based on religion, which leads to inconsistencies and inequalities in matters of civil rights and obligations. This essay explores the necessity of implementing a uniform civil law in India as an essential step toward building a strong, cohesive, and inclusive nation.

**I. The Current Scenario: Fragmented Personal Laws**

India's legal system is governed by personal laws, which vary based on an individual's religious affiliation. Hindus, Muslims, Christians, and other communities have separate laws governing personal matters. This fragmentation often leads to contradictions and disparities in legal provisions, hindering the development of a unified legal framework for the country.

**A. Challenges and Inequalities:** The lack of uniformity in personal laws leads to disparities in rights and obligations for citizens of different religious backgrounds. For example, the rights of women in matters of inheritance, divorce, and maintenance differ significantly across communities, perpetuating gender-based inequalities. Such disparities weaken the social fabric and hinder the nation's ability to progress as a cohesive society.

**B. Legal Complexity:** The coexistence of multiple personal laws adds complexity to the legal system. The judiciary often faces challenges in adjudicating cases involving conflicts between different religious laws, resulting in delays and uncertainty in justice delivery. A uniform civil law can streamline legal processes, reduce the burden on courts, and enhance the efficiency of the justice system.

**II. The Case for Uniform Civil Law:**

**A. Secularism and Equality:** India's Constitution enshrines the principles of secularism and equality. A uniform civil law is a critical step toward upholding these principles, ensuring that all citizens are treated equally under the law, regardless of their religious beliefs. It would establish a common standard for civil rights and obligations, promoting a sense of unity and belonging among diverse communities.

**B. Empowerment of Women:** A uniform civil law can significantly impact women's rights and empowerment. It would provide a level playing field, ensuring that women across all religious communities have equal rights in matters of marriage, divorce, inheritance, and maintenance. This would help break the shackles of patriarchal norms and foster gender equality and social progress.

**C. Simplification of Legal System:** By replacing the myriad of personal laws with a single, coherent civil law, the legal system would be streamlined, and legal procedures would be simplified. This would reduce the burden on the judiciary, enhance the efficiency of the legal process, and make justice more accessible to all citizens.

**III. Addressing Concerns and Challenges:**

**A. Respecting Cultural Diversity:** Implementing a uniform civil law does not imply disregard-



Arts & Science College 160 * KURHA *

ing cultural diversity. It is essential to strike a balance between preserving cultural identities and upholding fundamental rights and gender equality. The uniform civil law can incorporate provisions that accommodate specific cultural practices while ensuring they do not violate the principles of equality and human rights.

**B. Consultation and Consensus:** To successfully implement a uniform civil law, it is crucial to engage in open dialogue and consultations with various religious and social stakeholders. Obtaining consensus and addressing legitimate concerns will strengthen the foundation of the law and ensure widespread acceptance and compliance.

**IV. Impact on Social Cohesion and National Development:**

**A. Social Cohesion:** A uniform civil law will foster a sense of unity and cohesion among citizens, transcending religious barriers. It will promote a shared understanding of civil rights and obligations, leading to increased social harmony and integration.

**B. Economic Development:** A consistent and transparent legal framework is crucial for economic development. A uniform civil law will facilitate business transactions and contracts, promoting investments, economic growth, and ease of doing business in India.

**C. Human Development and Gender Equality:** By ensuring gender equality, a uniform civil law will empower women, leading to enhanced human development. Women's increased participation in education, employment, and decision-making will contribute to the overall socio-economic progress of the nation.

**V. Legal Certainty and Uniformity:**

**A. Reducing Ambiguity and Confusion:** The presence of multiple personal laws often leads to confusion and ambiguity in legal matters, especially in cases involving individuals of different religious backgrounds. A uniform civil law would provide legal certainty and clarity, ensuring that citizens understand their rights and obligations regardless of their religious affiliation.

**B. Avoiding Forum Shopping:** The existence of diverse personal laws can lead to forum shopping, where individuals may choose a legal system that is most advantageous to their case. This practice undermines the integrity of the legal system and can result in contradictory judgments. Implementing a uniform civil law would prevent forum shopping and promote consistency in legal decisions.

**VI. Enhancing National Integration:**

**A. Fostering a Common Identity:** A uniform civil law can play a vital role in fostering a sense of common identity among citizens. By providing a single set of civil rights and obligations applicable to all, it encourages individuals to identify as Indians first and members of their religious communities second. This shift in identity promotes national integration and solidarity.

**B. Countering Divisive Politics:** Differences in personal laws have been exploited by certain political groups to advance divisive agendas. Implementing a uniform civil law can help counter such divisive politics by emphasizing the principles of secularism and equality enshrined in the Constitution.

**VII. Streamlining Legal Processes:**

**A. Family Disputes and Personal Matters:** Family disputes, such as divorce, inheritance, and child custody cases, often become contentious and protracted due to conflicting personal laws. A uniform civil law can streamline the resolution of such disputes, promoting timely justice and reducing emotional distress for the parties involved.

**B. Cross-Border Marriages:** In cases of cross-border marriages, where individuals from different religious backgrounds marry, the existence of multiple personal laws can lead to legal complexities and challenges. A uniform civil law would simplify legal procedures and provide a clear framework for such marriages.



Arts & Science College 160 KURHA

**VIII. Global Perception and Investment:**

**A. Foreign Investors' Confidence:** A robust legal system is crucial for attracting foreign direct investment (FDI) and enhancing India's standing in the global economy. A uniform civil law would signal stability and consistency in the legal environment, increasing foreign investors' confidence in the Indian market.

**B. Ease of Doing Business:** A uniform civil law would contribute to India's efforts to improve its ranking in the Ease of Doing Business Index. A transparent and predictable legal framework is essential for creating a business-friendly environment and encouraging entrepreneurship.

**IX. Role of the Judiciary:**

**A. Simplifying Adjudication:** The Indian judiciary is burdened with a vast number of cases related to family disputes and personal matters. A uniform civil law would simplify the adjudication process, allowing the judiciary to focus on more pressing legal issues and reducing the backlog of cases.

**B. Upholding Fundamental Rights:** The Constitution of India guarantees fundamental rights to all citizens, irrespective of their religious beliefs. A uniform civil law would ensure that these rights are uniformly protected and upheld for all citizens.

**X. Socio-Economic Impact:**

**A. Economic Empowerment:** Empowering women through a uniform civil law would have a positive socio-economic impact. Increased female workforce participation, improved educational opportunities, and greater access to economic resources would contribute to economic growth and development.

**B. Reducing Socio-Economic Disparities:** A uniform civil law would play a significant role in reducing socio-economic disparities by ensuring equitable distribution of resources and opportunities among different religious communities.

**Conclusion:**

In conclusion, establishing a unified civil law that cuts across religious lines and maintains the ideals of secularism, equality, and social justice is necessary for developing a strong India. A universal civil law can pave the path for a more inclusive, cohesive, and progressive India by resolving inequities, empowering women, streamlining the legal system, and fostering social cohesion. However, it is essential to achieve a balance between maintaining fundamental rights and appreciating cultural diversity through open communication and consensus-building. Realising a single civil law will be a crucial step in India's development into a stronger, more cohesive country. For India to become a powerful, harmonious, and inclusive country, a single civil code must be implemented. A law like that would encourage secularism, equality, and social justice, while simplifying legal processes and enhancing national integration. By empowering women, streamlining legal procedures, and fostering a common identity, a uniform civil law can drive socio-economic progress and attract foreign investment. It is essential to address concerns and engage in meaningful consultations to strike a balance between cultural diversity and the principles of justice and equality. Embracing a uniform civil law would mark a significant step forward in India's journey toward becoming a united and progressive nation.

❑❑❑

Arts & Science College 160 KURHA
Principal
Arts & Sci. College
Kurha

(SJIF) Impact Factor-8.575 ISSN-2278-9308
ISSUE No- (CCCXXXIX ) 339

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

February -2022

## Sustainability Management: Concept, Applications and Research Opportunities



Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

Dr.Vijay Tompe
Editor
G. S. Tompe Arts Comm & Sci. College Chandur Bazar Dist. Amravati

Dr. Sachin Bhombe
Dr. Shashikant Dupare
Co-Editors
G. S. Tompe Arts Comm & Sci. College Chandur Bazar Dist. Amravati

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

# अमरावती विभागातील ग्रामीण – नागरी व स्त्री – पुरुष साक्षरतेतील विषमता

प्रा. किशोर मारोतराव ताकसांडे डॉ. सुनील आखरे
भूगोल विभाग कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा

सारांश :

साक्षरता ही सर्व प्रकारच्या विकासाची जननी आहे. साक्षरता ही राष्ट्राची अशी अमूल्य संपत्ती आहे की, जिच्यामुळे संस्कृतीचा विकास होतो.आर. सी. चांदना यांच्या मतानुसार साक्षरता ही गरिबी निर्मूलन,मानसिक एकाकीपणाचे समाजिकरण,शांतिपूर्ण संबंधाची निर्माती,आंतरराष्ट्रीय बंधुत्व आणि लोकसंख्याशास्त्रीय प्रक्रियांच्या स्वतंत्र क्रियाशीलतेमध्ये अत्यंत महत्वाची असते भूगोलामध्ये लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करीत असतांना साक्षरतेच्या अभ्यासाला अतिशय महत्व आहे.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील अमरावती विभागातील ग्रामीण व नागरी तसेच स्त्री व पुरुष साक्षरतेचे अध्ययन करण्यात आले आहे.अमरावती विभागाची एकूण साक्षरता ८५.०३ % आहे, याच विभागातील ग्रामीण विभागातील साक्षरतेची टक्केवारी ८२.८१ % आहे तर शहरी विभागातील साक्षरतेची टक्केवारी ९०.७५ % आहे, त्याचप्रमाणे पुरुषांची साक्षरता ९०.८८% आहे तर महिलांची साक्षरता ७८.८७% आहे यावरून असे दिसते की अमरावती विभागामध्ये ग्रामीण व नागरी विभागामध्ये तसेच पुरुष व स्त्रियांच्या साक्षरतेमध्ये विषमता आहे.

बिजसंज्ञा : ग्रामीण साक्षरता, नागरी साक्षरता, पुरुष साक्षरता, स्त्री साक्षरता

**प्रास्ताविक**

साक्षरता हे आर्थिक - सामाजिक विकासाचे महत्वाचे सूचक आहे. साक्षरता ही मानवाचा दृष्टिकोण आणि वर्तणूक बदलविणारे एकक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने साक्षरतेची व्याख्या "लिहिता वाचता येण्याची क्षमता म्हणजे साक्षरता" अशी केली आहे तर भारताच्या जनगणनेनुसार साक्षरतेची व्याख्या "जि व्यक्ति वाचन व लेखन करू शकते तसेच सोप्या भाषेत वाक्य तयार करू शकते,तिला साक्षर असे म्हणतात" अशी केली आहे. आधुनिक काळामध्ये ज्या प्रदेशाची साक्षरता जास्त असेल तो प्रदेश प्रगत समजल्या जातो. सेनगुप्ता यांच्या मतानुसार महिलांच्या साक्षरतेमुळे लोकसंख्या नियंत्रित राहते तसेच बालमृत्यू कमी होतो.

**उद्दिष्टे :**

२०११ च्या जनगणनेनुसार अमरावती विभागातील विविध जिल्ह्यातील एकूण साक्षरता,ग्रामीण व नागरी विभागातील साक्षरता तसेच स्त्री – पुरुष साक्षरतेमधील विषमतेचा अभ्यास करणे.

**अभ्यास क्षेत्र :**

भारतातील महाराष्ट्र राज्यात कोकण,पुणे,नाशिक,औरंगाबाद,नागपूर व अमरावती असे एकूण सहा प्रशासकीय विभाग आहेत. यापैकी अमरावती व नागपूर विभागस विदर्भ म्हणून ओळखले जाते. नागपूर विभागास पूर्व विदर्भ तर अमरावती विभागस पश्चिम विदर्भ असे म्हणतात. अमराबती विभागाचा अक्षवृत्तीय विस्तार १९° २६' उत्तर अक्षवृत्त ते २१° ४६' उत्तर अक्षवृत्त पर्यन्त आहे तर रेखावृत्तीय विस्तार ७५° ५७' पूर्व रेखावृत्त ते ७९° ९' पूर्व रेखावृत्त पर्यन्त आहे. याविभागाचे एकूण क्षेत्रफळ ४६०९० चौकीमी आहे. अमरावती विभागामध्ये अमरावती,अकोला,बुलडाणा,यवतमाळ व वाशिम असे एकूण पाच जिल्हे आहे, या विभागाच्या उत्तरेला मध्यप्रदेश,पूर्वेला नागपूर विभाग,दक्षिणेला तेलंगणा प्रदेश,पश्चिमेला व नैऋत्येला औरंगाबाद विभाग व वायव्येला नाशिक विभाग आहे. अमरावती जिल्ह्यात सातपुडा पर्वतांच्या रांगा आढळतात त्यांना गाविलगड टेकड्या असे म्हणतात तर यवतमाळ,अकोला,बुलडाना व वाशिम जिल्ह्यात अजिंठ्याच्या डोंगररांगा आढळतात. या विभागाची एकूण लोकसंख्या ११२५८११७ इतकी असून २७.६७% लोकसंख्या नागरी भागात राहते

**माहिती स्त्रोत आणि अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा अमरावती विभागातील सर्व जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन व भारतीय जनगणना अहवाल यातून मिळवलेल्या दुय्यम स्वरूपाच्या माहितीवर आधारित आहे. अमरावती विभागातील विविध जिल्ह्यातील एकूण साक्षर लोकसंख्या वरून पुढील सूत्राच्या सहाय्याने साक्षरता दर काढला आहे.



Arts & Science College 160 KURHA

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 339(CCCXXXIV)

ISSN : 2278-9308
February, 2022

एकूण साक्षर लोकसंख्या

१) साक्षरता दर = ------------------------------------------ x १००

६ वर्षे वयोगटावरील एकूण लोकसंख्या

अमरावती विभागतील विविध जिल्ह्यातील ग्रामीण-नागरी व स्त्री पुरुष साक्षतेमधील विषमता निर्देशांक काढण्याकरिता डेव्हिड सोफर (१९७४) यांच्या खालील सूत्राचा वापर केला आहे.

२) DI = LOG(X2/X1) + LOG (100-X1) / (100-X2)

येथे,

DI = विषमता निर्देशांक

X1 = ग्रामीण साक्षरता

X2 = नागरी साक्षरता

तसेच स्त्री - पुरुष साक्षरतेमध्ये

X1 = स्त्री साक्षरता

X2 = पुरुष साक्षरता

अभ्यास क्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्याचा साक्षरता दर सूत्र क्रमांक १ नुसार काढून सूत्र क्रमांक २ नुसार काढली आहे व आलेखाद्वारे ती दाखवली आहे.

**विषय विवेचन आणि विश्लेषण :**

अमरावती विभागाची सरासरी साक्षरता ८५.०३ % असून विभागातील विविध जिल्ह्यामध्ये साक्षरतेच्या प्रमाणामध्ये विविधता आढळते. विभागामध्ये सर्वाधिक साक्षरता दर अकोला (८८.०४%) जिल्ह्यात असून, अमरावती (८७.३८%) जिल्ह्याचा दूसरा क्रमांक लागतो तर विभागामध्ये सर्वात कमी साक्षरता यवतमाळ जिल्ह्यात (८२.८२%) आढळते.महिलांची सर्वाधिक साक्षरता अकोला जिल्ह्यात (८३.५३%) आहे तर सर्वात कमी साक्षरता वाशिम जिल्ह्यामध्ये (७५.४८%) आढळते. सर्वच जिल्ह्यामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची साक्षरता कमी आढळते तसेच ग्रामीण विभागामध्ये नागरी विभागापेक्षा कमी साक्षरता आढळते.

सारणी क्रमांक १

अमरावती विभाग : विविध जिल्ह्यातील एकूण,ग्रामीण – नागरी,स्त्री पुरुष साक्षरता

| अ.क्र. | जिल्हा | | एकूण साक्षरता % | पुरुष साक्षरता % | महिला साक्षरता % |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | एकूण | ८७.३८ | ९१.४६ | ८३.१० |
| | | ग्रामीण | ८५.०७ | ९०.१० | ७९.७६ |
| | | नागरी | ९१.४८ | ९३.८८ | ८८.९८ |
| २. | अकोला | एकूण | ८८.०४ | ९२.३३ | ८३.५३ |
| | | ग्रामीण | ८५.९४ | ९१.२५ | ८०.३१ |
| | | नागरी | ९१.२३ | ९३.९९ | ८८.३५ |
| ३. | बुलडाना | एकूण | ८३.४० | ९०.५४ | ७५.८४ |
| | | ग्रामीण | ८१.८५ | ८९.७४ | ७३.४९ |
| | | नागरी | ८९.०९ | ९३.५१ | ८४.४५ |
| ४. | यवतमाळ | एकूण | ८२.८२ | ८९.४१ | ७५.९३ |
| | | ग्रामीण | ८०.४७ | ८७.९३ | ७२.६३ |
| | | नागरी | ९१.२४ | ९४.७३ | ८७.६३ |
| ५. | वाशिम | एकूण | ८३.२५ | ९०.५५ | ७५.४८ |
| | | ग्रामीण | ८२.१७ | ९०.१६ | ७३.६३ |
| | | नागरी | ८८.२९ | ९२.३९ | ८४ |



Arts & Science College 160 KURHA

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 339(CCCXXXIV)
ISSN : 2278-9308
February, 2022

**अमरावती विभागातील स्त्री – पुरुष साक्षरतेतील विषमता :**


अमरावती विभागातील विविध जिल्ह्यातील स्त्री – पुरुष साक्षरतेच्या बाबतीत खूप जास्त विषमता आढळते सर्वाधिक विषमता वाशिम जिल्ह्यामध्ये असून तिचा निर्देशांक ०.४९३ हा आहे,त्यानंतर बुलडाणा (०.४८४) जिल्ह्याचा स्त्री – पुरुष साक्षरतेच्या विषमतेमध्ये दूसरा क्रमांक आहे.

सारणी क्रमांक ३

अमरावती विभाग : विविध जिल्ह्यातील स्त्री – पुरुष साक्षरतेतील विषमता निर्देशांक

| अ. क्र | जिल्हा | पुरुष % | स्त्री साक्षरता % | विषमता निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ९१.४६ | ८३.१० | ०.३३८ |
| २ | अकोला | ९२.३३ | ८३.५३ | ०.३७५ |
| ३ | बुलडाणा | ९०.५४ | ७५.८४ | ०.४८४ |
| ४ | यवतमाळ | ८९.४१ | ७५.९३ | ०.४२८ |
| ५ | वाशिम | ९०.५५ | ७५.४८ | ०.४९३ |
| अमरावती विभाग | | ९०.८८ | ७८.८७ | ०.४२६ |

स्त्रोत : संशोधक



त्यानंतर यवतमाळ (०.४२८) जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असून अकोला (०.३७५) व अमरावती (०.३३८ ) जिल्ह्यामध्ये स्त्री – पुरुष साक्षरतेचा विषमता निर्देशांक सर्वात कमी आहे.

**निष्कर्ष व उपाय योजना :**

अमरावती विभागातील साक्षरतेचे अध्ययन केल्यास असे दिसते की,शहरी विभगापेक्षा ग्रामीण विभागामध्ये सर्वच जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते. तसेच सर्वच जिल्ह्यांमध्ये पुरुषांच्या साक्षरतेपेक्षा स्त्रियांची साक्षरता बरीच कमी आहे.करीता ग्रामीण विभागामध्ये साक्षरता दर वाढविणे आवश्यक आहे तसेच महिलांचा साक्षरता दर वाढविणे आवश्यक आहे विशेष म्हणजे ग्रामीण विभगातील महिलांचा साक्षरता दर सर्वात कमी आहे.



Arts & ... College 160 KURHA

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अमरावती विभाग | एकूण | ८५.०३ | ९०.८८ | ७८.८७ |
| | ग्रामीण | ८२.८१ | ८९.६० | ७५.६४ |
| | नागरी | ९०.७५ | ९३.९१ | ८७.४६ |

स्त्रोत : भारतीय जनगणना अहवाल २०११

**ग्रामीण - नागरी विभागातील साक्षरतेतील विषमता :**


अमरावती विभागातील विविध जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी विभागामध्ये साक्षरतेच्या बाबतीत खूप जास्त विषमता आढळते सर्वाधिक विषमता यवतमाळ जिल्ह्यामध्ये असून तिचा निर्देशांक ०.४०३ हा आहे,त्यानंतर अमरावती(०.२७५) जिल्ह्याचा नागरी व ग्रामीण साक्षरतेच्या विषमतेमध्ये दूसरा क्रमांक आहे, त्यानंतर बुलडाना (०.२५७) जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असून अकोला (०.२३१) व वाशिम (०.२१४) जिल्ह्यामध्ये ग्रामीण व नागरी साक्षरतेचा विषमता निर्देशांक सर्वात कमी आहे.

सारणी क्रमांक २

अमरावती विभाग : विविध जिल्ह्यातील ग्रामीण – नागरी साक्षरतेतील विषमता निर्देशांक

| अ. क्र | जिल्हा | नागरी साक्षरता % | ग्रामीण साक्षरता % | विषमता निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ९१.४८ | ८५.०७ | ०.२७५ |
| २ | अकोला | ९१.२३ | ८५.९४ | ०.२३१ |
| ३ | बुलडाणा | ८९.०८ | ८१.८५ | ०.२५७ |
| ४ | यवतमाळ | ९१.२४ | ८०.४७ | ०.४०३ |
| ५ | वाशिम | ८८.२९ | ८२.१७ | ०.२१४ |
| अमरावती विभाग | | ९०.७५ | ८२.८१ | ०.३०९ |

स्त्रोत : संशोधक






Arts & Science College KURHA 160

ISSN : 2278-9308
February, 2022

संदर्भ सूची :

१. Korde Shirvaram & More Jyotiram (2019) : Disparity In Literacy And Sex Ratio Of Ahmednagar District Maharashtra Bhugolshashtra Sanshondhan Patrika Vol – 36,No.2, Jul-Dec 2019 Page No – 1 – 5

२. Biswas B. (2016) Regional Disparities Pattern of Literacy in Rural and Urban Area of West Bengal, India Global Journal of Multidisciplinary Studies 5(7): 105-112.

३. Chandna R. C. (2016). Geography of Population Concept Determinants and Pattern, Kalyani Publishers Pvt.Ltd, New Delhi

४. Musmade A. H., More J. C. (2011), Geographical Analysis of Sex Ratio in Rahuri Tahsil Of Ahmednagar District Maharashtra Bhugolshastra Sansodhan Patrika Jan-Jun 2011, Vol 28 No. 2, PP 103-110.ISSN-0971-6785.

Arts & Science College 160 KURHA
Principal
Arts & Sci. College
Kurha

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 352 (CCCLII)
ISSN : 2278-9308
May, 2022

# अमरावती शहरातील रस्ते मार्गाची सापेक्ष घनता – भौगोलिक अध्ययन

प्रा. दिपक उ अंबोरे
भूगोल विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती मोबाईल क्र – ९७३०१९८६७८, इमेल – deepakambore710@gmail.com ,पीएच.डी. संशोधक विद्यार्थी (Ph.D. Research Scholar)
पीएच.डी. संशोधन केंद्र - कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा, जिल्हा –अमरावती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

डॉ.सुनील वा. आखरे
भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा, जिल्हा –अमरावती

सारांश

कुठल्याही प्रदेशातील रस्ते हे त्या प्रदेशातील विकासाचे सूचक असतात. रस्ते मार्गाचा विकास अधिक असल्यास इतर घटकांच्या विकासाला चालना मिळते. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात रस्ते मार्गाचे महत्वाचे योगदान आहे. रस्ते मार्गाच्या विकासात रस्ते मार्गाच्या घनतेला विशेष असे महत्व आहे कारण ज्या प्रदेशात रस्ते मार्गाची घनता अधिक असते तिथे व्यापार केंद्र विकसित झालेले मिळतात तर इतर सेवा-सुविधांचाही विकास झालेला आढळून येतो.

अमरावती शहर हे विदर्भातील एक मुख्य शहर असून या शहराच्या विकासात रस्ते मार्गाचे महत्वाचे योगदान आहे. प्राचीन ऐतिहासिक वारसा असलेल्या अमरावती शहरतील रस्ते मार्गाची प्रगती वेळोवेळी होत गेलेली आहे परंतु ही प्रगती सर्व शहरात समान आढळत नाही. प्रस्तुत संशोधन निबंधात अमरावती शहरातील रस्ते मार्गाची सापेक्ष घनतेचे प्रभागनिहाय अध्ययन करण्यात आलेले आहे.

**बीजसंज्ञा**-रस्ते मार्ग, घनता, प्रती चौ.किमी. , उच्च, निम्न, मध्यम

प्रस्तावना

रस्ते विकासात रस्ते मार्गाच्या घनतेचे महत्व आहे कारण रस्ते घनता अधिक असणारा प्रदेश विकसित असतो. वाहतुकीच्या घनतेचे वर्णन मानवी सभ्यतेच्या प्रगतीतील जीवन रक्त म्हणून केले गेले आहे. सामन्यता एखाद्या प्रदेशात आर्थिक आणि सामाजिक परस्पर संवाद सुलभ करण्याच्या दृष्टीकोनातून रस्त्यांचे जाळे विकसित केले जाते. रस्त्यांच्या प्रगतीद्वारे होणारा प्रादेशिक विकास हा एकंदरीत क्षेत्र आणि लोकसमूहामध्ये समान रीतीने मानवी कल्याणासाठी उद्दिष्ठ्य असलेली प्रक्रिया आहे

प्रस्तुत संशोधनात अमरावती शहरातील रस्ते मार्गाचे प्रभागनिहाय घनतेचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आलेले आहे.

उद्दिष्ठ्ये

प्रस्तुत अभ्यासाची मुख्य उद्दिष्ठ्ये पुढील प्रमाणे,

१) अमरावती शहरातील रस्ते मार्गाच्या सापेक्ष घनतेचे प्रभागनिहाय अध्ययन करणे

२) अमरावती शहरातील रस्ते मार्गाच्या सापेक्ष घनतेचे तुलनात्मक अध्ययन करणे

**माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती**

प्रस्तुत अभ्यासासाठी उपयोगात आलेली माहिती ही प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे. ही माहिती अमरावती महानगर पालिका, शहराचा पर्यावरण अहवाल व जिल्हा जनगणना पुस्तिका याद्वारे संकलित केलेली आहे.

रस्ते मार्गाची सापेक्ष घनता काढण्यासाठी पुढील सूत्राचा उपयोग करण्यात आलेला आहे.

$$RD\ (Per\ Sqkm) = Rd \div A$$

RD - रस्ते मार्गाची सापेक्ष घनता (प्रती चौ.किमी. )
(Relative Density of Road Network)

Rd - प्रभागातील एकूण रस्त्यांची लांबी,

A - प्रभागाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ

संकलित केलेली व सूत्राद्वारे प्राप्त झालेली माहिती ही सारणी मध्ये दर्शविण्यात आलेली असून सापेक्ष घनतेचे वितरण नकाशामध्ये प्रदर्शित केलेले आहे. तसेच प्रभागनिहाय रस्ते मार्गाची लांबी व भौगोलिक क्षेत्रफळ हे आलेखाच्या सहाय्याने दर्शविलेले आहे.



Arts & Science College KURHA 160

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 352 (CCCLII)
ISSN : 2278-9308
May, 2022

**अभ्यास प्रदेश**

अमरावती शहर हे महाराष्ट्र राज्याच्या पूर्वेकडे असून हे शहर अमरावती जिल्हा व विभागाचे मुख्य ठिकाण आहे. अमरावती शहराचे स्थान देशाच्या जवळपास केंद्रस्थानी आहे.

अमरावती शहराचा अक्षवृत्तीय विस्तार २०° ५०' १५" उत्तर ते २१° १' ११" उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७७° ४४' ८" पूर्व ते ७७° ५०' ११" पूर्व आहे. अमरावती शहराचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १२१.८८ चौ.किमी. असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ६४७०५७ एवढी आहे. एकूण लोकसंख्येत ३२९९९२ पुरुष आणि ३१७०६५ स्त्री लोकसंख्या आहे. शहराची लोकसंख्या घनता ५३०९ व्यक्ती प्रती चौ.किमी. आहे.

**अमरावती शहरातील रस्ते मार्ग**

अमरावती शहरातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ गेलेला असून तो पश्चिमेकडे धुळे तर पूर्वेकडे कोलकाताकडे जातो. अमरावती शहरापासून जिल्ह्यातील सर्व तालुके हे राज्य महामार्गांनी जोडलेले आहे.

वर्ष २०१८ नुसार अमरावती शहरातील मुख्य रस्त्यांची एकूण लांबी २६८.३ किमी असून सर्वाधिक रस्ते मार्गाची लांबी ही जुनी व नवी वस्ती बडनेरा, संत गाडगे बाबा- पी.डी.एम.सी. परिसर व शेगाव-रहाटगाव या प्रभागात आढळते कारण या प्रभागांचे क्षेत्रफळ मोठे आहे (सारणी क्रमांक १).

अमरावती शहरात बस, रेल्वे सेवा उपलब्ध असून शहरातील अंतर्गत भागातील वाहतुकीसाठी शहर बसेसची सेवा उपलब्ध आहे.

**अमरावती शहरातील रस्ते मार्गांची सापेक्ष घनता (प्रती चौ.किमी)**

रस्ते मार्गाच्या घनतेमध्ये रस्ते मार्गांची लांबी किंवा उपलब्धता ही कुठल्याही प्रदेशातील क्षेत्रफळ आणि लोकसंख्या एककाच्या संदर्भात काढली गेलेली असते (Badigas G.S. and K.R., 2003).

सारणी क्रमांक १ मध्ये अमरावती शहरातील प्रभागनिहाय मुख्य रस्त्यांची एकूण लांबी, भौगोलिक क्षेत्रफळ आणि प्रती चौ.किमी. असलेली रस्त्यांची सापेक्ष घनता दर्शविलेली आहे.

सारणी क्रमांक १

अमरावती शहर – प्रभागनिहाय रस्ते मार्गांची सापेक्ष घनता (२०१८)


| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | एकूण रस्त्यांची लांबी (किमी) | भौगोलिक क्षेत्रफळ (चौ.किमी) | रस्ते मार्गांची सापेक्ष घनता (प्रती चौ.किमी) |
|---|---|---|---|---|
| १ | शेगाव-रहाटगाव | २३.४८ | ११.२९ | २.०८ |
| २ | श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. | २४.७१ | ११.४१ | २.१७ |
| ३ | नवसारी | २०.७ | १०.३७ | २.०१ |
| ४ | जमील कॉलोनी | ७.४७ | २.९ | २.५८ |
| ५ | महेंद्र कॉलोनी-नवीन कॉटन मार्केट | ४.५१ | २.१८ | २.०७ |
| ६ | विलास नगर-मोरबाग | ६.९८ | २.१७ | ३.२२ |
| ७ | जवाहर स्टेडीयम | १५.८९ | ३.६२ | ४.३९ |
| ८ | जोग स्टेडीयम-चपराशीपुरा | १२.६३ | ३.१७ | ३.९८ |
| ९ | एस.आर.पी.एफ.-वडाळी | २१.०३ | १७.६५ | १.१९ |
| १० | वेनोडा भीमटेकडी-दस्तूर नगर | ७.९५ | २.८३ | २.८१ |
| ११ | फ्रेजरपुरा | ३.९२ | १.७२ | २.२८ |
| १२ | रुक्मिणी नगर-स्वामी विवेकानंद | ४.७५ | १.७९ | २.६५ |
| १३ | अंबापेठ-गोरक्षण | १०.११ | २.७८ | ३.६४ |



Arts & Science College KURHA 160

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | जवाहरगेट-बुधवारा | २.४५ | १.५१ | १.६२ |
| १५ | छाया नगर-गवळीपुरा | १.६१ | १.६४ | ०.९८ |
| १६ | अलीम नगर-रेहमत नगर | ३.७७ | १.६२ | २.३३ |
| १७ | गडगडेश्वर | १२.१ | ६.९३ | १.७५ |
| १८ | राजापेठ-श्री संत कवराम | ८.४६ | २.४२ | ३.५ |
| १९ | साई नगर | १९.०१ | ८.३ | २.२९ |
| २० | सूतगिरणी | ६.२२ | २.७२ | २.२९ |
| २१ | जुनी वस्ती बडनेरा | २६.०५ | ११.३४ | २.३ |
| २२ | नवी वस्ती बडनेरा | २४.५ | ११.५२ | २.१३ |
| | एकूण | २६८.३ | १२१.८८ | २.२ |

स्रोत – अमरावती महानगर पालिका आणि संशोधक




रस्ते मार्गाची घनता म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रात असलेली रस्त्यांची लांबी होय. म्हणजेच एखाद्या प्रदेशाचे भौगोलिक क्षेत्रफळ, व त्या प्रदेशातील एकूण रस्त्यांची लांबी याचे गुणोत्तर म्हणजे रस्ते मार्गाची घनता असते.

सापेक्ष घनते मध्ये प्रदेशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राचा विचार केल्या जातो. प्रस्तुत घटकात अमरावती शहरातील प्रभागनिहाय रस्ते मार्गाची सापेक्ष घनता दर्शविली असून त्याचे विवेचन करण्यात आलेले आहे.

संपूर्ण अमरावती शहराचा विचार केल्यास शहरात प्रती चौ.किमी. ला सरासरी एकूण २.२० किमी रस्त्यांची घनता आढळू येते. म्हणजेच दर चौ.किमी. क्षेत्रात एकूण २ ते ३ किमी रस्ते असल्याचे आढळते.

**अति निम्न घनता क्षेत्र (प्रती चौ.किमी.ला १ किमी पेक्षा कमी)**

शहरात छाया नगर-गवळीपुरा (प्रभाग क्रमांक १५) या भागात रस्त्यांची सापेक्ष घनता दर चौकीमिला सर्वात कमी आढळून येते. या भागातील प्रती चौ.किमी. असणारी घनता ०.९८ किमी असून हा प्रभाग शहराच्या

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**

Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 352 (CCCLII )

ISSN : 2278-9308
May, 2022


पश्चिमेला आहे. या प्रभागाच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्त्यांची लांबी इतर प्रभागाच्या तुलनेत कमी असल्याचे लक्षात येते.

**निम्न घनता क्षेत्र (प्रती चौ.किमी. ला १ ते २ किमी)**

एस.आर.पी.एफ.-वडाळी (१.१९), जवाहरगेट-बुधवारा (१.६२) आणि गडगडेश्वर (१.७५) या परिसरात रस्त्यांची दर चौ.किमी. ला घनता १ ते २ किमी दरम्यान असल्याचे आढळून येते. एस.आर.पी.एफ.-वडाळी म्हणजेच प्रभाग क्रमांक ९ चे क्षेत्रफळ शहरात सर्वात अधिक असून क्षेत्रफळाच्या तुलनेत मुख्य रस्त्यांचा विकास कमी आढळतो. या प्रभागातून एक्सप्रेस हायवे तसेच राज्य महामार्ग क्रमांक २०० आणि २४३ जातात. परंतु प्रभागांचे भौगोलिक क्षेत्रफळ अधिक असल्याने ही घनता निम्न असल्याचे दिसून येते.

गडगडेश्वर या प्रभागातून राज्य महामार्ग क्रमांक २०० हा भातकुली कडे जातो तसेच हा प्रभाग शहराच्या पश्चिमेकडे सीमावर्ती प्रदेशात असून क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्ते मार्ग कमी विकसित आहेत.

जवाहर गेट व बुधवारा परीसर म्हणजे शहरातील जुनी वस्ती असलेला प्रदेश असून ह्या भागातील रचना अरुंद अशी आहे आणि या प्रदेशातून केवळ शहरी रस्तेच गेले आहे. मुख्य रस्त्यांचा विकास हा क्षेत्रफळाच्या तुलनेत कमी आढळतो.



**मध्यम घनता क्षेत्र (प्रती चौ.किमी. ला २ ते ३ किमी)**

अमरावती शहरात एकूण १३ प्रभागांमध्ये मुख्य रस्ते मार्गांची सापेक्ष घनता ही मध्यम स्वरुपाची असल्याचे आढळून येते. या मध्यम घनतेमध्ये रुक्मिणी नगर-स्वामी विवेकानंद (२.६५) आणि बेनोडा भीमटेकडी-दस्तूर नगर (२.८१) या प्रभागामध्ये दर चौकीमिला रस्त्यांची लांबी सर्वाधिक आढळून येते. शहरातील मध्य भागापासून दक्षिणेडील प्रदेश या मध्यम घनतेत समाविष्ट दिसून येतो (नकाशा क्रमांक १), शहरातील सुमारे ५०% पेक्षा अधिक क्षेत्र हे मध्यम सापेक्ष घनता असल्याचे निदर्शनास येते.

**उच्च घनता क्षेत्र (प्रती चौ.किमी. ला ३ ते ४ किमी)**

अमरावती शहरातील प्रभाग क्रमांक ६ विलास नगर-मोरबाग (३.२२), प्रभाग १८ राजापेठ-श्री संत कवराम (३.५), प्रभाग १३ अंबापेठ-गोरक्षण (३.६४) आणि प्रभाग ८ जोग स्टेडीयम-चपराशीपुरा (३.९८) या प्रदेशातील रस्त्यांची सापेक्ष घनता ही प्रती चौ.किमी. ला ३ ते ४ किमी दरम्यान आढळून येते. हे चारही प्रभाग एकमेकाशी संलग्नित आहेत. राजापेठ परिसर हा शहराच्या मध्य भागात असून त्याला लागुनच अंबापेठचा परिसर आहे. या प्रदेशात वाहतुकीची वर्दळ सतत असते तसेच या प्रदेशात नवीन उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग बांधले असल्याचे रस्त्यांची घनता ही इतर प्रदेशाच्या तुलनेत उच्च आढळून येते.

जोग स्टेडीयम-चपराशीपुरा हा परिसर शहराची पूर्वेकडे असून अमरावती मध्यवर्ती बस स्थानकाच्या जवळचा प्रदेश आहे. या भागातून मोर्शी, नागपूर, चांदूर रेल्वे, या स्थानाकडे जाणारे राज्य महामार्ग जातात, तसेच क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्त्यांचा विकास समधानकारक दिसतो त्यामुळे रस्त्यांची घनता प्रती चौ.किमीला उच्च असल्याचे दिसून येते.

विलास नगर-मोरबाग हा प्रभाग क्षेत्रफळाने लहान आहे परंतु शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारे मुख्य रस्ते या भागातून जातात. त्यामुळे या प्रभागाची घनता अधिक आढळते.

**अती उच्च घनता क्षेत्र (प्रती चौ.किमी. ला ४ किमी पेक्षा अधिक)**

शहरातील प्रभाग क्रमांक ७ म्हणजेच जवाहर स्टेडीयम च्या परिसरात रस्ते मार्गांची सापेक्ष घनता ही सर्वाधिक आढळून येते. या परिसरातील प्रती चौकीमिला रस्त्यांची लांबी ४.३९ किमी आढळून येते. शहरातील मुख्य मध्यवर्ती बस स्थानक आणि रेल्वे स्टेशन या प्रभागात असून सर्वच दिशेने मुख्य रस्त्यांचे जाळे पसरलेले आहे. त्यामुळे या परिसरात क्षेत्रफळ आणि रस्ते मार्ग यांचे गुणोत्तर सर्वात जास्त आढळून येते.

**निष्कर्ष व उपाययोजना**

अमरावती शहरातील केवळ एकाच प्रभागात म्हणजे जवाहर स्टेडीयम च्या परिसरात रस्ते मार्गाची सापेक्ष घनता ही अती उच्च आढळून येते. तर इतर प्रभागात क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्ते मार्गांचा विकास आणखीन अपेक्षित आहे.

नवसारी, शेगाव-रहाटगाव, श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. या परिसरात रस्ते मार्गांची लांबी अधिक आहे परंतु क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्ते मार्गाची घनता कमी आढळते. या प्रभागांमध्ये एका विशिष्ट क्षेत्रातच मुख्य रस्ते मार्गांची प्रगती आढळून येते. नवसारी च्या पश्चिमेकडे, शेगाव-रहाटगावच्या उत्तरेकडे तसेच श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. च्या पूर्वेकडे मुख्य रस्ते मार्गाचे जाळे फारच कमी विकसित आहे. या प्रभागांचे क्षेत्रफळ व लोकसंख्येची गरज लक्षात घेता रस्ते मार्गाची घनता आणखीन वाढणे आवश्यक आहे.

ज्या क्षेत्रात रस्ते मार्गांची सापेक्ष घनता उच्च व अती उच्च आहे अशा प्रदेशात वाहतुकीची वर्दळ देखील अधिक असते आणि अशा प्रभागांमध्ये वाहतुकीची कोंडी बघितल्यास या परिसरात रस्त्यांचा विकास वाढविणे आवश्यक आहे. अशा प्रदेशात मुख्य रस्त्यांची रुंदी वाढवून तसेच पर्यायी मुख्य रस्ते बांधून व उड्डाणपूल निर्माण करून इत्यादींच्या सहाय्याने रस्त्यांचा विकास करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

१ अंबोरे दिपक (२०२०), "अमरावती शहरातील रस्ते वाहतूक सुगमता व संपर्कतेचा शहराच्या विकासावर प्रभाव : भौगोलिक अध्ययन", पीएच.डी. संशोधन आराखडा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२ Badigas G. S. and Badigas K. R. (2003), "Impact of Transport Development on Industrial in Gas", (Quoted in Geography of "Transport Development in India." Edited by Vaidya B. C. (2003), Concept Pub. New Delhi, Page No. 250-272).

३ Rani Dr Subodh (2018), "Road Density and Regional Development in Haryana- 2011", Global Journal for Research Analysis, Volume-7, Issue-3, March-2018, Page No 57.

Suchit Kumar Rai, Sunil Kumar, Arvind Kumar Rai, Satyapriya and Dana Ram Palsaniya 2014 Climate Change Variability and Rainfall Probability for Crop Planning in Few Districts of Central

India. Atmos. Climate Sci. 4 394-403.
Suchit Kumar Rai, Sunil Kumar, Arvind Kumar Rai, Satyapriya and Dana Ram Palsaniya 2014 Climate Change Variability and Rainfall Probability for Crop Planning in Few Districts of Central India. Atmos. Climate Sci. 4 394-403.
Suchit Kumar Rai, Sunil Kumar, Arvind Kumar Rai, Satyapriya and Dana Ram Palsaniya 2014 Climate Change Variability and Rainfall Probability for Crop Planning in Few Districts of Central India. Atmos. Climate Sci. 4 394-403.
Suchit Kumar Rai, Sunil Kumar, Arvind Kumar Rai, Satyapriya and Dana Ram Palsaniya 2014 Climate Change Variability and Rainfall Probability for Crop Planning in Few Districts of Central India. Atmos. Climate Sci. 4 394-403.

Arts & Science College 160 KURHA
Principal
Arts & Sci. College
Kurha